| MHSO200025972025 | **नियमित दिवाणी दावा क्र. ४४८/२०२५** |
| --- | --- |

## निशाणी क्र. १५ वरील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ०६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता परवानगी मागणीसाठी केला आहे.

२. प्रस्तुत अर्जात वादींनी असे कथन केले आहे की, त्यांनी प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दावा दाखल करतेवेळी नजरचुकीने व अनावधानाने हिंदू एकत्र कुटुंबाची जमीन गट क्र. ९३/२ ही समाविष्ट करण्याचे राहून गेलेले आहे. सदरचा दावा हा वाटपासाठी असल्याने सदरची मिळकत दाव्यात समाविष्ट करणे न्यायाच्यादृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. याउलट सदर मिळकत समाविष्ट न केल्यास दाव्यास हॉचपॉटची बाधा येणार आहे. सदरची दुरुस्ती हा तांत्रीक स्वरुपाची असून सदर दुरुस्ती केल्यास दाव्याच्या आशयात व विषयात कसलाही बदल होत नाही याउलट दुरुस्ती न केल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादींनी प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्तीस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचे प्रकरण लांबविण्यासाठी सदरचा गट क्रमांक हा जाणूनबुजून नमूद केलेला नव्हता. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींचे प्रस्तुत अर्जाद्वारे असे कथन आहे की,

दावा दाखल करतेवेळी नजरचुकीने व अनावधानाने हिंदु एकत्र कुटूंबाची जमीन गट क्र. ९३/२ ही समाविष्ट करण्याचे राहून गेलेले आहे. वादींनी नि.क्र. १६ सोबत मौजे वझरे येथील गट क्र. ९३/२ या मिळकतीचा ७/१२ उताऱ्याची संगणकीय प्रत दाखल केली आहे. सदर ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता वादी क्र. १, प्रतिवादी क्र. १ ते ९ यांची नावे नमूद असल्याचे निदर्शनास येते. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असल्याने दाव्यामध्ये एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती समाविष्ट असणे कायद्याने गरजेचे आहे. अन्यथा सदर दाव्यास हॉचपॉचची बाधा येणार आहे. अशा परीस्थीतीत दाव्याचे स्वरुप पाहता व वादी, प्रतिवादी यांच्यामधील वादाचे पूर्णतः निराकरण होण्यासाठी सदर मिळकत प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करणे न्यायाच्या दृष्टीकोनातून गरजेचे आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याने सदर दुरुस्तीमुळे मुळ दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नसुन सदरची दुरुस्ती प्रतिवादींच्या हितास हानीकारक नाही. उलट, सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्यातील गुंतागुंत कमी होवुन दाव्याची योग्य ती निर्गती करणे निश्चितच सुकर होईल. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा प्राथमिक टप्प्यात आहे. सबब, वरील सर्व बाबींचे अवलोकन करता, वादींना अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी देणे उचित होईल. सबब, आदेश खालीलप्रमाणे –

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. वादी व प्रतिवादी यांनी प्रस्तुत आदेशाची नोंद घ्यावी.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.02.25 17:35:24 +0530

(एस. एस. साळुंखे)

दि. २५/०२/२०२६.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सांगोला

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २५/०२/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | २५/०२/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | २६/०२/२०२६ |